# प्रेसनोट

दिनांक– २९/०६/२०१८.

## मिरा भाईंदर महानगरपालिका येथील कनिष्ठ अभियंता यांचेविरुध्द लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल.

दिनांक २८/०६/२०१८ रोजी, मिरा भाईंदर महानगरपलिकेतील कनिष्ठ अभियंता, शैलेश शिंदे, वय–३८ वर्ष, यांच्याविरुध्द तक्रारदार यांच्याकडे २,००,०००/– रुपये लाचेची मागणी केल्यावरुन काशिमिरा पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामिण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याबाबत थोडक्यात हकिगत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांच्या हॉटेल बांधकामावर अतिक्रमण कारवाई न करण्याकरीता वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे २,००,०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदवली होती

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे २,००,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून, लोकसेवक शैलेश शिंदे यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती वैशाली रासकर, पोलीस निरीक्षक, अेसीबी, ठाणे हया करीत आहेत.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner